# मिरा भाईंदर महानगरपालिका

## MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालय: स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि.ठाणे-401101.

दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल : mbmcho@gmail.com वेबसाईट : www.mbmc.gov.in

मुख्य कार्यालय


जा.क्र. : मिभा/मनपा/वैआप्र/ २६६/२०२१-२२ दिनांक : २२/०४/२०२१

## आदेश

**अत्यंत महत्वाचे/ तातडीचे**

**विषय:- कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेले निर्बंध लागू करणेबाबत.**

**संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.कोरोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च २०२०**
**२) मिभा/मनपा/वै.आ./७५/२०२१-२२. दि. ०५/०४/२०२१ रोजीचा आदेश**
**३)आयुक्त पशुसंवर्धन यांचे एमएडब्लूबी/२०-२१/तां-१/प्र.क्र.२२/६७०/२०२०,पसं-६, पुणे, दि. ०६/०४/२०२१ रोजीचे पत्र**
**४) महाराष्ट्र शासन आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दि. १३/०४/२०२१**
**५) मिभा/मनपा/वै.आ./२२०/२०२१-२२, दि. १८/०४/२०२१ रोजीचा आदेश**
**६) महाराष्ट्र शासन आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दि. २१/०४/२०२१**

ज्याअर्थी, साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम, १८९७ च्या खंड २,३ व ४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कोरोना विषाणूमुळे (COVID-१९) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी अधिसूचना क्र. कोरोना२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य५, दि. १४ मार्च २०२० ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे आणि ज्याअर्थी सदर अधिसूचनेच्या नियम ३ अन्वये आयुक्त महानगरपालिका हे सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे, त्याअर्थी, महानगरपालिका कार्यक्षेत्रात COVID-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी म्हणून काम पाहतील.

आणि, ज्याअर्थी, शासन आदेशास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत यापूर्वी संदर्भ क्र. ०१ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आदेशान्वये मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत.

ज्याअर्थी, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव शहरात वाढत असून, महानगरपालिकेचे सर्व DCHC, DCH या ठिकाणी सर्व रूग्ण-बेड व आय.सी.यू. बेड पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. याशिवाय सदर ठिकाणी ऑक्सिजनचा तुटवडा प्रचंड प्रमाणात जाणवत आहे. शासनाकडे याबाबत महानगरपालिका सातत्याने पाठपुरावा करत असून भविष्यामध्ये रूग्णसंख्या याच वेगाने वाढत राहिल्यास ऑक्सिजन, रूग्ण-बेड व आय.सी.यू. बेड उपलब्ध न झाल्याने मोठ्या प्रमाणात जिवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ज्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता कोविडचा संसर्ग रोखण्यासाठी खबरदारीची प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आणखी काही निर्बंध लागू करण्याची आवश्यकता निर्माण झाली असल्याचे आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी, दिलीप ढोले, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, कोरोना विषाणू COVID-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून संपूर्ण मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीक, वाहनांची

22.04.2021.

वर्दळ यावर नियंत्रण आणणेकरीता व कोरोना विषाणूची साखळी तोडण्यासाठी (Break The Chain) प्राप्त अधिकारात खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १. | औषधांची दुकाने | १) औषधांची दुकाने दिनांक २३/०४/२०२१ ते दिनांक ३०/०४/२०२१ या कालावधीमध्ये Social Distancing चे पालन करुन सुरु राहतील.<br>२) रुग्णालयातील (ज्या ठिकाणी आंतररुग्ण विभाग सुरु आहे अशा ठिकाणी) औषधांची दुकाने २४ तास किंवा त्यांच्या सोयीनुसार सुरु ठेवण्याची मुभा असेल.<br>३) २४ तास सुरु ठेवण्यासाठी परवानगी असणाऱ्या औषधी दुकानांना २४ तास सुरु ठेवण्याची मुभा असेल.<br>४) औषधांच्या दुकानांमध्ये औषधे व वैद्यकीय साहित्य या व्यतीरीक्त इतर सामान (General Store) विक्रीस मनाई असेल. |
| २. | दूध व डेअरी आस्थापना | उपरोक्त कालावधीमध्ये दररोज सकाळी ०७:०० ते सकाळी ११:०० वाजेपर्यंत सुरु राहतील. |
| ३. | पेट्रोल पंप | १) अत्यावश्यक सेवेतील वाहने (वैध परवाना धारक)<br>२) शासकीय वाहने व शासकीय कर्मचारी यांची वाहने (ओळखपत्र धारक) यांना पेट्रोल / डिझेल / सी. एन.जी. पुरवठा करण्याची मुभा असेल. |
| ४. | i) किराणा दुकान<br>ii) भाजीपाला व फळ विक्रेता (महानगरपालिकेने निश्चित केलेली ठिकाणे व सोसायटीमधील भाजीपाला व फळ विक्रेते)<br>iii) कृषी संबंधित सर्व सेवा / पशुखाद्य दुकाने<br>iv) अंडी, मटण, चिकन व मासळी विक्री | १) उपरोक्त कालावधीकरीता रोमवार ते शुक्रवार सकाळी ०७:०० ते सकाळी ११:०० पर्यंत सुरू राहतील.<br>२) तथापि शनिवार व रविवार पुर्णत: बंद राहतील. |

**तथापि याव्यतिरीक्त खालीलप्रमाणे खास बाबींकरीता परवानगी असेल.**

१) हॉटेल रेस्टॉरंट व बार यांची घरपोच सेवा उपरोक्त काळात सकाळी ०७:०० वाजेपासून रात्री ०७:०० वाजेपर्यंत सुरू राहील. मात्र पार्सल (पिक-अप) घेऊन जाणेस मज्जाव असेल.

२) अंत्यविधीकरीता केवळ २० व्यक्तींना परवानगी असेल.



22.04.2021.

जा.क्र. : मिभा/मनपा/वैद्यका/ २६६/२०२१-२२ दिनांक : २२/०४/२०२१

३) स्थानिक प्राधिकरणाद्वारे केली जाणारी मान्सून-पूर्व कामे व अत्यावश्यक सेवेतील कामे.
४) पाळीव प्राणी खाद्य दुकाने, प्राण्यांसंबंधी सेवा इ.

**लग्न कार्ये :**

१) लग्न समारंभाकरीता केवळ २५ व्यक्तींना परवानगी असेल.
२) लग्न कालावधीकरीता अधिकाधिक २ तासाचा कालावधी देण्यात येईल.
३) नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा कुटुंबास रू. ५०,०००/- इतका दंड आकारण्यात येईल.
४) वरीलप्रमाणे गुन्हा केल्यास सदरची आस्थापना सिल केली जाईल आणि कोविड-१९ साथरोग अस्तित्वात असेपर्यंत सदरची जागा बंद/सिल राहील.

**कार्यालये :**

खालील कार्यालये ही अपवादात्मक सेवेमध्ये असतील

१) केंद्र व राज्य शासनाची कार्यालये
२) सहकारी, सार्वजनिक युनिट व खाजगी बँका
३) कॉल सेंटर, डेटा सेंटर्स, क्लाऊड सर्व्हिसेस/ आयटी सेवा संबंधित महत्वाच्या पायाभूत सुविधा आणि सेवा.

- वरील नमुद कार्यालयांनी कमीत कमी कर्मचाऱ्यांसोबत काम करावे आणि एका वेळेला कार्यालयामध्ये क्षमतेच्या १५% पेक्षा जास्त कर्मचारी कोणत्याही स्थितीत हजर राहणार नाहीत याची खबरदारी घ्यावी.
- फक्त कोविड-१९ च्या कामासाठी असणारी शासकीय/ निमशासकीय कार्यालये यास अपवाद असतील.

**सार्वजनिक वाहतूक :**

सार्वजनिक वाहतूक हे खालील प्रतिबंधासह पूर्णपणे सुरू राहील.

| | |
|---|---|
| ऑटो रिक्षा | वाहनचालक + दोन प्रवासी |
| टॅक्सी (चार चाकी) | वाहनचालक + वाहन क्षमतेच्या (५०% प्रवासी) |
| राज्य शासनाच्या व महानगरपालिकेच्या बस | बसण्याच्या क्षमतेच्या ५०% इतके प्रवासी (उभे राहून प्रवास करण्यास बंदी असेल) |

**खाजगी वाहतूक :**

- खाजगी बसेस सह सर्व खाजगी वाहने फक्त आपात्कालिन स्थितीत, अत्यावश्यक सेवेसाठी किंवा आदेशात नमुद केलेल्या कारणासाठी ५०% इतक्या क्षमतेने वाहतूक करू शकतील.
- वरील नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर रू. १०,०००/- इतका दंड आकारण्यात येईल.

**वर्तमानपत्रे/ मासिके/ नियतकालिके:**

- वर्तमानपत्रे नियतकालिके /मासिके / छपाई आणि वितरण करण्यास परवानगी राहील.
- घरपोच सेवा (Home Delivery) लागू राहील.

22.04.2021.

**वैद्यकीय सेवा :**

- वैद्यकीय आणि आरोग्य सेवा ज्यात उत्पादन आणि वितरण संबंधी आस्थापना असतील म्हणजे वितरक, वाहतूकदार, पुरवठा साखळीतील व्यक्ती, लसींचे उत्पादन व वितरण, सॅनिटायजर, मास्क, वैद्यकीय उपकरणे, इतर पूरक उत्पादने आणि सेवा सुरू राहतील.

**शास्ती :**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दि. १३/०४/२०२१ च्या आदेशास अनुसरून सर्व शास्ती आकारण्यात येतील.

**वरील नमुद केलेल्या आस्थापनांव्यतिरीक्त इतर सर्व आस्थापना दि. २३/०४/२०२१ रोजी सकाळी ०५:०० ते दि. ०१/०५/२०२१ रोजी सकाळी ०७:०० वाजेपर्यंत वाजेपर्यंत बंद राहतील.**

उक्त आदेशाचे उल्लंघन करणारी व्यावसायिक आस्थापना आणि दुकानदार मालक, व्यक्ती यांच्यावर उपरोक्त अधिसूचनेमधील महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, 2020 चे नियम 11 नुसार, भारतीय दंडसंहिता (45 of 1860) कलम 188 मधील तरतुदीनुसार दंडनीय / कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

22.04.2021.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत :-**

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
२) मा.पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
३) मा.राज्यमंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
४) मा.महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका.
५) मा.मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
६) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
७) मा.पोलिस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर वसई-विरार.
८) मा.जिल्हाधिकारी, जि.ठाणे.
९) मा.उपमहापौर/मा.सभापती,स्थायी समिती/मा.सभागृह नेता/मा.विरोधी पक्षनेता/सर्व गटनेता कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.
१०) स्वीय सहाय्यक, आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.
११) उपायुक्त (सर्व) यांचेकडे माहितीसाठी.
१२) सर्व सहा.आयुक्त/सर्व विभागप्रमुख यांना माहितीसाठी.
१३) मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालये, सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी